# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

## प्रेसनोट दिनांक २३/०४/२०२१

**मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश यांचे हस्ते डी.वाय.पाटील हॉस्पीटल, पिंपरी, पुणे येथे कोरोनाबाधीत पोलीसांकरीता ३० बेडच्या एका वार्डची उभारणी केले बाबत.**

दिनांक २३/०४/२०२१ रोजी सायंकाळी १६:०० वा चे सुमारास मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश पिंपरी चिंचवड, पोलीस आयुक्तालय, मा. डॉ. पी.डी. पाटील कुलपती डॉ.डी.वाय.पाटील विद्यापीठ, मा. अप्पर पोलीस आयुक्त श्री. रामनाथ पोकळे, मा. पोलीस उप-आयुक्त श्री. सुधीर हिरेमठ, श्री. मंचक ईप्पर, श्री. आनंद भोईटे, मा. डॉ. यशराज पाटील , मा. डॉ. जे एस भवाळकर, मा. डॉ.एच एस. चव्हाण यांच्या हस्ते पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील कोरोनाबाधीत पोलीसांकरीता ३० बेडच्या एका वार्डची उभारणी करण्यात आली आहे. सध्या देशामध्ये थैमान घातलेल्या कोरोना या संसर्गजन्य साथीच्या रोगाची साथ सुरु असल्याने पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील कर्तव्यावर असलेले पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार हे समाजातील सर्व स्तरावर मिसळुन कोरोना बद्दलच्या नियमांची अंमलबजावणी व्हावी याकरीता आपले कर्तव्य बजावीत असतात. त्यामुळे कोरोनाची बाधा होण्याची शक्यता ही सर्वात जास्त पोलीसांना असते.

कोरोना विरोधी लढयामध्ये पोलीस हे फ्रंटलाईन वॉरीयर्स म्हणुन काम करीत आहेत. आजपर्यंत पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील एकुण ७९१ पोलीस हे कर्तव्यादरम्यान कोरोना बाधीत झाले असुन ०४ पोलीस अंमलदार यांनी कोरोना विरोधी लढयामध्ये आपला जीव गमावुन हुतात्मा झाले आहेत. त्याकरीता पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय पोलीस अंमलदारांसाठी कोरोना आजारापासुन बचावाकरीता वेळोवेळी मास्क, सेनिटायझर, हॅण्डग्लोज, गॉगल्स, इत्यादी साहित्य उपलब्ध करुन दिले आहे तसेच अधिकारी व अंमलदार यांना आयुर्वेदिक काढा व गरम पाणी घेणेबाबतच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे हॉस्पीटलमध्ये उपचार घेत असलेल्या कोरोनाबाधीत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना ऑक्सीजन, बेड, रेमडेसिवीर इंजेक्शन तसेच इतर आवश्यक औषधे वेळेत उपलब्ध करुन दिले असुन या सर्व प्रकारच्या उपाययोजना करीत आहे.

या परिस्थीतीत त्यांचे मनोबल खचुन जाऊ नये म्हणुन पोलीसांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी कर्तव्यादरम्यान कोरोना या संसर्गजन्य साथीचे रोगाची लागण झाल्यास त्यांना उपचाराकरीता तात्काळ बेड उपलब्ध होऊन योग्यरित्या उपचार व्हावे या उद्देशाने पिंपरी चिंचवड पोलीसांसाठी सध्या बेड मिळणे जिकरीचे झाले असल्याने त्याचा एक भाग म्हणुन डी.वाय.पाटील प्रशासनाशी मा. पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश यांनी संपर्क साधुन विनंती केली असता त्यांनी तात्काळ सकारात्मक प्रतिसाद देऊन डी.वाय.पाटील हॉस्पीटल, पिंपरी येथे तीस बेडचा विशेष कक्ष पोलिसांसाठी निर्माण करुन दिला आहे. सदर सर्व ३० बेड हे ऑक्सीजन पुरवठायुक्त असणार आहेत. तसेच क्रेडाई पुणे चे अध्यक्ष श्री. फरांदे यांच्या माध्यमातुन सदर वार्डसाठी पाच व्हेंटीलेटर सुध्दा पुरविण्यात येणार आहेत. कोरोना संक्रमणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस व त्यांचे कुटुंबियांना तात्काळ उपचार मिळावे यासाठी डॉ.डी.वा.पाटील रुग्णालय कटीबध्द आहे. यामुळे पोलीस दलाचे मनोधैर्य उंचावले असुन कोरोना या संसर्गजन्य रोगाचे आव्हानाचा मुकाबला करण्यासाठी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय सुसज्य आहे.

**( कृष्ण प्रकाश )**
पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड